भूमि अभिलेख विभागातील उप अधीक्षक, गट-ब संवर्गातील <u>अधिकाऱ्यांच्या बदलीबाबत........</u>

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांक : आस्था-२०१७/प्र.क्र.१९६/ई-६
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : १४ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा:</u> जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. आस्था/ प्र.क्र.७६/२०१७/आ-१, दिनांक १३.०२.२०१७

<u>प्रस्तावना :-</u>

श्री. किरण संपतराव माने, उप अधिक्षक भूमि अभिलेख, मुल, जि. चंद्रपूर यांनी त्यांची आई मानसिक विकाराने ग्रस्त असून, त्यांच्यावर सन २००६ पासून, सांगली येथे औषधोपचार सुरु आहेत. तसेच त्यांच्या वडीलांचे दिनांक ०६.०३.२००६ रोजी निधन झाले असून, आईची काळजी घेण्यासाठी घरामध्ये इतर कोणीही नसल्याने ते सध्या कार्यरत असलेला नागपूर हा महसूली विभाग बदलून पुणे विभाग देण्याची विनंती केली होती. तसेच वाचा येथील नमूद पत्राद्वारे जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख,महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी श्री.माने यांना महसूल विभाग बदलून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. प्रस्तुत प्रकरणी "महाराष्ट्र शासकीय गट - अ व गट - ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०१५" मधील नियम १२ अन्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता होत असल्याने श्री.किरण माने यांना वाटप करण्यात आलेला नागपूर हा महसूली विभाग बदलून पुणे हा महसूली विभाग देण्यास सक्षम प्राधिकरणाने मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने श्री. माने यांना पुणे महसूली विभागामध्ये बदलीने पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन आदेश :-</u>

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ४ (४) (दोन) आणि कलम ४ (५) अन्वये प्राप्त अधिकारानुसार भूमि अभिलेख विभागातील, उप अधीक्षक भूमि अभिलेख (गट-ब) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या, खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र. ०३ मध्ये नमूद केल्यानुसार बदल्या करण्यात येत आहेत.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नाव व सध्याची पदस्थापना	बदलीनंतरची पदस्थापना	शेरा
०१	०२	०३	०४
०१	श्री.किरण संपतराव माने, उप अधिक्षक भूमि अभिलेख, मुल, जि. चंद्रपूर	नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर, जि. कोल्हापूर	श्रीमती सुवर्णा पाटील यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदी.
०२	श्रीमती सुवर्णा पाटील, नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर	उप अधिक्षक भूमि अभिलेख, कागल, जि. कोल्हापूर	रिक्त पदी

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१८०२१४१७१००९०८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Haridasrao Bhogle

Digitally signed by Santosh Haridasrao Bhogle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cfe36679ae12922422bc5e7f7d277841f1fe67725f465c272fd6727259260b3d, cn=Santosh Haridasrao Bhogle
Date: 2018.02.14 17:17:27 +05'30'

(डॉ.संतोष भोगले)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:

१) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) उप संचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे / नागपूर प्रदेश, नागपूर (द्वारा जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, म.रा., पुणे)
३) संबंधीत अधिकारी (द्वारा जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, म.रा.पुणे)

प्रत :- १) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१/२,मुंबई/नागपूर
२) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
३) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
४) निवडनस्ती ई-६ कार्यासन, महसूल व वन विभाग.